# दवीपकल्पीय पठारी प्रदेश- दख्खन

**प्र.२. थोडक्यात उतरे लिहा**

**५. पूर्वेच्या पठारांच्या उपविभागांची नावे लिहा.**

**उत्तर:** पूर्वेचे पठार महानदीचे खोरे, दंडकारण्य आणि गर्हजातचे डोंगर या तीन उपविभागांचे मिळून बनलेले आहे.

**६. महानदीच्या खोऱ्याच्या दक्षिणेला कोणते पठार आहे?**

**उत्तर:** दंडकारण्य पठार हे महानदीच्या खोऱ्याच्या दक्षिणेला आहे.

## ७.२ हवामान

---

**७. दख्खनच्या पठारावरील कोणत्या भागात उष्ण कटिबंधीय निम-शुष्क हवामान आढळते?**

**उत्तर:** i. दख्खनच्या पठाराच्या मध्य भागात निम-शुष्क प्रकारचे हवामान आहे.

ii. यामध्ये कर्नाटक, तामिळनाडूचा पश्चिम आणि अंतर्गत भाग, पश्चिम आंध्र प्रदेश आणि मध्य महाराष्ट्र इत्यादी भागांचा समावेश होतो.

## ७.३ मृदा

**८. दख्खनच्या पठारावरील कोणत्या ठिकाणी लाल मृदा आढळून येते?**

**उत्तर:** लाल मृदा तामिळनाडू, कर्नाटक पठार आणि आंध्र पठार या प्रदेशांत आढळून येते.

## ७.४ नैसर्गिक वनसंपत्ती आणि प्राणिजीवन

**९. दख्खनच्या पठारावर कोणत्या प्रकारची वने आढळून येतात?**

**उत्तर:** दख्खनच्या पठारावर विविध प्रकारची वने आढळून येतात, जसे:

- i. विषुववृत्तीय सदाहरित वने
- ii. उष्णकटिबंधीय आर्द्र पानझडी वने
- iii. उष्णकटिबंधीय शुष्क पानझडी वने
- iv. काटेरी वनस्पतींची वने

**१०. दख्खनच्या पठारावर कोणत्या प्रकारचे वृक्ष आढळून येतात?**

**उत्तर:** दख्खनच्या पठारावर साग, साल, शिसव, चंदन, खैर, हिरडा आणि अर्जुन हे वृक्ष आढळतात.

**११. दख्खनच्या पठारावरील वने का नष्ट होत आहेत?**

**उत्तर:** शेतजमिनीचा विस्तार आणि खाणकाम यांमुळे दख्खनच्या पठारावरील वने नष्ट होऊ लागली आहेत.

**१२. दख्खनच्या पठारावर आढळणाऱ्या प्राण्यांची माहिती लिहा.**

**उत्तर:**
i. पठारावरील जंगलात हरीण, चारशिंगी सांबर, काळवीट, गवा, रानरेडा इत्यादी गवत खाणारे प्राणी आढळतात.

ii. याशिवाय वाघ, रानटी कुत्रा, अस्वल हे मांसाहारी प्राणी आढळतात.

iii. सरपटणाऱ्या प्राण्यांचे हे माहेरघर आहे.

**१३. दख्खनच्या पठारावरील अस्तित्व धोक्यात आलेले प्राणी व पक्षी कोणते?**

**उत्तर:** दख्खनच्या पठारावरील शेकरू या प्राण्याचे व सुमारे ३०० पक्ष्यांच्या जातींचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

**१४. दखखनच्या पठाराच्या उत्तर आणि ईशान्य सीमेजवळ राहणाऱ्या दोन आदिवासी जमातींची नावे लिहा.**

**उत्तर:** दखखनच्या पठाराच्या उत्तर आणि ईशान्य सीमेजवळ भिल्ल आणि गोंड जमातीचे लोक राहतात.

**१५. दखखनच्या पठारावरील मुख्य शहरांची नावे लिहा.**

**उत्तर:**
- i. दखखनच्या पठारावरील मोठी शहरे हैद्राबाद आणि बेंगलुरू ही आहेत.
- ii. इतर मुख्य शहरांमध्ये कर्नाटकातील म्हैसूर, तामिळनाडूतील कोईमतूर आणि सालेम, महाराष्ट्रातील पुणे, नागपूर, नांदेड आणि औरंगाबाद इत्यादींचा समावेश होतो.

**१६. कोणत्या कारणांमुळे महाराष्ट्रातील पठारी प्रदेश केंद्रित वसाहतींसाठी अनुकूल ठरला आहे?**

**उत्तर:** महाराष्ट्रातील पठारी प्रदेश सुपीक मृदा, चांगला पाणी-पुरवठा आणि विकसित शेती यांमुळे केंद्रित वसाहतींसाठी अनुकूल ठरला आहे.

**१७. दख्खनच्या पठारावर विपुल प्रमाणात आढळणाऱ्या खनिजांची नावे लिहा.**

**उत्तर:** दख्खनच्या पठारावर मँगनीज, कोळसा, कच्चे लोखंड, चुनखडक, तांबे, बॉक्साइट, सिलिका वाळू, क्रोमाइट, चिनीमाती आणि खनिजमीठ ही उद्योगांसाठी लागणारी खनिजे मोठ्या प्रमाणावर आढळतात.

**१८. महाराष्ट्र राज्यातील कोणत्या जिल्ह्यात बिटुमिनस दगडी कोळसा सापडतो?**

**उत्तर:** महाराष्ट्रातील नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांत बिटुमिनस दगडी कोळसा सापडतो.

**१९. कर्नाटक-तेलंगणा पठारावर कोणती महत्त्वाची खनिजे आढळून येतात?**

**उत्तर:** कर्नाटक-तेलंगणा पठारावर उच्च प्रतीचे कच्चे लोखंड, तांबे, मँगनीज, क्रोमाइट, चिनीमाती, चुनखडक इ. महत्त्वाची खनिजे आढळून येतात.

**२०. कर्नाटक-तेलंगणा पठारावर विकसित झालेल्या उद्योगांची नावे लिहा.**

**उत्तर:** कर्नाटक-तेलंगणा पठारावर यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक उत्पादने, दूरसंचार साधने इ. उद्योगधंद्यांचा विकास झाला आहे.

२१. **दख्खनच्या पठारावरील महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय विमानतळांची नावे लिहा.**

**उत्तर:** बेंगलुरू, हैद्राबाद आणि नागपूर ही महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय विमानतळे दख्खन पठारावर आहेत.

## प्र.३. टिपा लिहा

### ७.१ प्राकृतिक रचना

**१. दख्खनचे पठार**

**उत्तर:** i. नर्मदेच्या दक्षिणेला असलेला त्रिकोणी प्रदेश हा दख्खनचे पठार म्हणून ओळखला जातो.

ii. हा एक उलटा त्रिकोण आहे, ज्याचा पाया उत्तरेला आणि शिरोबिंदू दक्षिणेला आहे.

iii. सातपुडा पर्वतरांगा आणि महादेव व मैकल डोंगर मिळून या त्रिकोणाचा पाया बनलेला आहे.

iv. सातपुडा रांगेच्या दक्षिणेकडील भाग अनेक पठारांनी बनलेला आहे.

v. पश्चिम घाट आणि पूर्व घाट या दख्खनच्या पठाराच्या सीमा आहेत.

## २. सातपुडा-महादेव-मैकल रांगा

**उत्तर:** i. सातपुडा-महादेव-मैकल हा एक डोंगररांगांचा समूह असून तो पूर्व-पश्चिम पसरला आहे आणि ही दख्खनच्या पठाराची उत्तर सीमा आहे.

ii. या समूहातील सर्वांत पश्चिमेकडील रांग म्हणजे सातपुडा पर्वतरांग. या रांगेने नर्मदा व तापी नद्यांच्या दरम्यानचे क्षेत्र व्यापले आहे.

iii. सातपुडा रांग पूर्व गुजरातपासून सुरू होते आणि पूर्वेकडे ती सुमारे ८०० किमीपर्यंत पसरली आहे.

iv. ही पर्वतरांग मध्यभागी खंडित झाली आहे आणि त्यामुळे उत्तर भारताकडे जाण्याचा मार्ग मिळतो. हा खंडित भाग बऱ्हाणपूर खिंड म्हणून ओळखला जातो.

v. येथील डोंगराचा माथा म्हणजे एक प्रकारे पठारच असून त्यांची उंची सुमारे ७०० मीटर आहे, तर काही डोंगर ९०० मीटरपेक्षा जास्त उंचीचे आहेत.

vi. सातपुडा पर्वताचा पूर्वेकडील विस्तार महादेव आणि मैकल रांगांच्या रूपाने दिसून येतो. या रांगा अनुक्रमे मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ राज्यांमध्ये आहेत.

vii. मैकल रांग साधारणपणे उत्तर-दक्षिण पसरली आहे आणि नर्मदा व महानदीचे खोरे यांमधील जलदुभाजक म्हणून ती काम करते.

viii. या डोंगरसमूहात नर्मदा, महानदी आणि वैनगंगा या तीन नदी प्रणालींची पाणलोट क्षेत्रे आहेत.

**३. बऱ्हाणपूर खिंड**

**उत्तर:** i. सातपुडा रांग पूर्व गुजरातपासून सुरू होते आणि पूर्वेकडे ती सुमारे ८०० किमीपर्यंत पसरली आहे.

ii. ही पर्वतरांग मध्यभागी खंडित झाली आहे.

iii. या खिंडीमधून उत्तर भारताकडे जाण्याचा मार्ग मिळतो आणि हा भाग बऱ्हाणपूर खिंड म्हणून ओळखला जातो.

**४. महाराष्ट्र पठारामधील बेसॉल्ट खडक**

**उत्तर:** i. महाराष्ट्र पठारामधील बेसॉल्ट खडकांची निर्मिती भेगीय उद्रेकामुळे पडलेल्या असंख्य भेगांमधून बाहेर आलेल्या लाव्हारसामुळे झाली आहे.

ii. या खडकांच्या थराची कमाल जाडी सुमारे २ किमी असावी असे मानले जाते.

iii. बेसॉल्ट खडकांच्या क्षितिजसमांतर रचनेमुळे त्या संपूर्ण प्रदेशाला भिन्न उंचीवर असलेल्या सपाट भूभागांच्या मालिकेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

### ५. महाराष्ट्र पठारावरील नद्या

**उत्तर:** i. महाराष्ट्र पठाराचा उत्तर भाग तापी नदीच्या खोऱ्याने व्यापला आहे त्याचा उतार पश्चिमेकडे आहे.

ii. तापीच्या दक्षिणेकडील पठाराचा उतार पूर्व दिशेला असून त्याने गोदावरी व कृष्णा खोऱ्यांचा उगमाकडील भाग व्यापला आहे.

iii. पश्चिम घाटाच्या अनेक उपशाखा पश्चिम ते पूर्व दिशेकडे जातात आणि विविध नद्यांच्या खोऱ्यांचे दुभाजक बनतात.

iv. महाराष्ट्र पठाराचा पूर्व भाग वर्धा-वैनगंगा खोऱ्याने व्यापला आहे. या नद्या साधारणतः उत्तर-दक्षिण दिशेला वाहतात.

### ६. कर्नाटक पठार

**उत्तर:** i. दख्खनच्या पठाराच्या सर्वांत दक्षिणेकडील भाग म्हणजे कर्नाटक पठार होय.

ii. कर्नाटकमध्ये पठारी प्रदेशाला 'मैदान' म्हणतात.

iii. मैदानाची सरासरी उंची ४०० मीटर आहे.

iv. या पठाराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे अनेक कमी उंचीच्या टेकड्या आहेत. त्यामुळे अनेक नद्यांच्या खोऱ्यांचे विभाजन होते.

v. या पठाराचा सर्वसाधारण उतार पश्चिमेकडून पूर्व दिशेकडे आहे.

vi. याच्या उत्तरेला गोदावरी व कृष्णा नद्यांचे खोरे असून दक्षिणेला कावेरी नदीचे खोरे आहे.

## ७. तेलंगणा पठार

**उत्तर:** i. तेलंगणा पठार हे कर्नाटक पठाराच्या पूर्व आणि ईशान्य दिशेला आहे.

ii. या प्रदेशाची पूर्व सीमा ही पूर्व घाट आहे.

iii. हा प्रदेश सपाट असून त्यावर काही मोजक्या ठिकाणी घुमटाकार टेकड्या आढळतात.

iv. या प्रदेशाची सरासरी उंची ३०० ते ६०० मीटर आहे.

## ८. महानदीचे खोरे

**उत्तर:** i. छोटा नागपूर पठाराच्या दक्षिणेला महानदीचे खोरे आहे.

ii. छोटा नागपूर पठाराच्या दक्षिणेला तुलनेने कमी उंचीचा प्रदेश आहे आणि तो जवळजवळ सर्व बाजूंनी डोंगररांगांनी आणि पठारांनी वेढलेला आहे.

iii. छत्तीसगढ राज्याचा मध्यवर्ती भाग आणि ओडिशा राज्याचा पश्चिम भाग या खोऱ्याने व्यापला आहे.

iv. पश्चिम सीमेवर मैकल रांगा आणि पूर्व सीमेवर पूर्व घाटाचे डोंगर आहेत.

v. खोऱ्याच्या दक्षिणेला दंडकारण्य पठार आहे.

vi. महानदीच्या खोऱ्याच्या सभोवताली असलेल्या पठारांची किंवा डोंगररांगांची सरासरी उंची ५०० मीटर आहे, तर बहुतेक ठिकाणी सखल प्रदेशाची उंची सरासरी ३०० मीटर आहे.

## ९. दंडकारण्य

**उत्तर:** i. छत्तीसगढ राज्याचा दक्षिण भाग आणि ओडिशा राज्याचा नैऋत्य भाग दंडकारण्य म्हणून ओळखला जातो.

ii. दंडकारण्याचा मध्य भाग हे उंचावलेले पठार असून, त्याची उंची सुमारे ७०० ते ८०० मीटर आहे.

iii. या पठाराचे इंद्रावती नदीमुळे प्रत्यक्षात दोन भाग झाले आहेत. इंद्रावती पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते.

iv. दंडकारण्य क्षेत्र हे लोहखनिजाच्या साठ्यांसाठी प्रसिद्ध आहे.

## ७.६ आर्थिक विकास

---

### १०. दख्खनच्या पठारावर घेतली जाणारी पिके

**उत्तर:** i. शेती हा या प्रदेशाचा मुख्य व्यवसाय असून उत्पादन वाढीसाठी जलसिंचनाचा वापर केला जातो. त्यामुळे विविध पिके घेतली जातात. दख्खनच्या पठारावरील कापूस, ऊस आणि तांदूळ ही प्रमुख पिके आहेत.

ii. दख्खनच्या पठाराच्या पूर्व भागात प्रामुख्याने तांदूळ हे पीक घेतले जाते.

iii. दख्खनच्या पठाराच्या उत्तर भागात गव्हाचे व कडधान्यांचे पीक घेतले जाते.

iv. ज्वारी, कापूस, ऊस व तेलबिया यांचे पीक मुख्यत्वे महाराष्ट्राच्या पठारावर घेतले जाते.

v. दख्खनच्या पठाराच्या पश्चिम भागात प्रामुख्याने बाजरीचे पीक घेतले जाते.

## ११. बंधारा आणि त्याचे उपयोग

**उत्तर:** i. बंधारा म्हणजे नदीवर बांधलेली धरणे किंवा मार्गात बदल करण्यासाठी घातलेले बांध होय.

ii. बंधाऱ्यामुळे नदीतील पाण्याची पातळी उंचावते आणि पाणी कालव्यांमधून वाहू लागते.

iii. पाण्याचा प्रवाह अडवून त्याचा साठा करण्यासाठीही त्यांचा उपयोग होतो.

iv. छोट्या प्रवाहावर बंधारा बांधला असता पावसाळ्यानंतरही काही महिने पाणीपुरवठा सुरू राहतो.

## *१२. मध्य कर्नाटक पठारावरील जलसिंचन

**उत्तर:** i. कन्नड भाषेत 'केरे' म्हणून ओळखले जाणारे तलाव हे मध्य कर्नाटक पठारावरील सिंचनाची पारंपरिक पद्धत आहे.

ii. दऱ्यांमधून वाहणाऱ्या प्रवाहांवर बांध घालून तलावांची साखळी निर्माण केली जाते.

iii. एका तलावातून बाहेर पडलेले पाणी दुसऱ्या तलावात येऊन साचत असते.

iv. सामान्यपणे हे तलाव काही किलोमीटर अंतरावर बांधलेले असतात. यामुळे दोन गोष्टी निश्चितपणे होत असतात:

अ. पाणी वाहून वाया जात नाही.

ब. ओळीने वर असलेल्या तलावातील झिरपणारे पाणी खालच्या तलावात गोळा होत असते.

**१३. दखखनच्या पठारावरील वाहतूक मार्ग**

**उत्तर:** i. दखखन पठारी प्रदेशात रस्ते व रेल्वे जाळे विकसित झाले आहे.

ii. राष्ट्रीय महामार्गांनी मुख्य शहरे जोडली जात आहेत.

iii. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीची सेवा उपलब्ध असून त्यामुळे औद्योगिक व्यापारी शहरे जोडली आहेत.

iv. बेंगलुरू, हैद्राबाद आणि नागपूर ही महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय विमानतळे या प्रदेशात आहेत.

***१४. दख्खनच्या पठारावरील पर्यटन**

**उत्तर:** i. दख्खनच्या पठारावर नैसर्गिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वाची अनेक पर्यटनस्थळे आहेत.

ii. बेंगलुरू आणि हैद्राबाद ही शहरे उद्यानांसाठी प्रसिद्ध आहेत.

iii. औरंगाबाद, बिदर, विजापूर, म्हैसूर, पुणे ही ऐतिहासिक शहरे आहेत.

iv. याशिवाय पठारी प्रदेशात जगभरातील लोकांना आकर्षित करणारी तुळजापूर, पंढरपूर, शिर्डी, गुलबर्गा, तिरुमला व मदुराई ही पर्यटनस्थळे आहेत.

म्हणून, दख्खनच्या पठारावर पर्यटन व्यवसायाचा चांगला विकास झालेला आहे.

## ७.७ नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय समस्या

---

**१५. दख्खन पठारावरील पर्यावरण समस्या**

**उत्तर:** i. दख्खन पठारावर मोठ्या प्रमाणात होणाऱ्या खाणकामामुळे तेथे जल आणि मृदा प्रदूषण होत आहे.

ii. दख्खन पठारामध्ये मोठ्या प्रमाणात जमिनीतून खनिज काढल्यानंतर सदर प्रदेश इतर बाबींसाठी निरुपयोगी ठरतो.

iii. शेतजमिनीचा विस्तार आणि खाणकाम यांमुळे जंगले नष्ट होऊ लागली आहेत.

iv. या प्रदेशात उद्योगधंद्यांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे हवा, पाणी आणि मृदा यांचेही प्रदूषण होत आहे.

**१६. दखखन पठारावरील नैसर्गिक आपत्ती [मार्च १४]**

**उत्तर:** i. दख्खन पठारी प्रदेशाचा पश्चिम भाग हा भूकंपप्रवण क्षेत्र आहे.

ii. येथे वारंवार भूकंप होतात व येथील भूकंपाची तीव्रता काही प्रदेशांत खूप जास्त आहे.

iii. १९९३ साली महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात भूकंप झाला होता, या भूकंपात अनेक लोक मृत्युमुखी पडले व मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली.

iv. कोयना धरणाचा परिसरही भूकंपप्रवण क्षेत्र आहे.

***१७. दखखनच्या पठारावरील नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय समस्या**

**उत्तर:** प्र.३ मधील (१५) व (१६) चे उत्तर पाहावे.

## प्र.४. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा.

### ७.१ प्राकृतिक रचना

**१. बेसॉल्ट खडकांच्या रचनेला 'डेक्कन ट्रॅप' म्हटले जाते.**

**उत्तर:** i. दख्खनच्या पठाराचा वायव्य भाग महाराष्ट्र पठार म्हणून ओळखला जातो.

ii. महाराष्ट्राचे पठार मुख्यत: अग्निजन्य (बेसॉल्ट) खडकांपासून बनले आहे.

iii. बेसॉल्ट खडकांच्या थरांची कमाल जाडी २ किमी असावी असे मानले जाते.

iv. बेसॉल्ट खडकांचे थर जवळजवळ क्षितिजसमांतर पसरले आहेत.

v. त्यामुळे, संपूर्ण भूभागाची रचना पायऱ्यांसारखी झाली आहे.

म्हणून, बेसॉल्ट खडकांच्या रचनेला 'डेक्कन ट्रॅप' म्हटले जाते.

### ७.५ लोकसंख्या आणि वसाहती

**२. *दख्खनचे पठार हे अनेक भाषांचे माहेरघर आहे.**

**किंवा**

**दख्खन हे अनेक भाषा व वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांचे माहेरघर आहे. [ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** i. पठाराच्या उत्तर आणि ईशान्य सीमांजवळ भिल्ल आणि गोंड जमातीचे लोक राहतात. हे लोक विविध भाषा बोलतात.

ii. महाराष्ट्र राज्यातील सर्व भागांत मराठी ही मुख्य भाषा आहे.

iii. आंध्र प्रदेश आणि कर्नाटकमध्ये अनुक्रमे तेलुगू आणि कन्नड भाषा बोलली जाते.

iv. दख्खन पठाराच्या दक्षिण भागातील तामिळनाडूत तमिळ ही मुख्य भाषा बोलली जाते आणि पठाराच्या नैऋत्य भागात मल्याळम भाषा बोलली जाते.

v. हैद्राबाद हे दक्षिणेकडील उर्दू भाषेचे केंद्र आहे.

म्हणून, दख्खन हे अनेक भाषांचे माहेरघर आहे.

***३. दखखनचे पठार हा औद्योगिकदृष्ट्या विकसित झालेला प्रदेश आहे.**

**उत्तर:** i. महाराष्ट्र हे देशातील एक अग्रेसर औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे.

ii. सुती कापड उद्योग हा राज्यातील सर्वांत मोठा आणि जुना उद्योग आहे.

iii. साखर उद्योग, वाहन उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स उद्योग आणि अन्नप्रक्रिया उद्योग तसेच इतर उद्योगांचा विकास झालेला आहे.

iv. कर्नाटक आणि तेलंगणा पठार खनिजसंपत्तीने समृद्ध आहे.

v. उच्च प्रतीचे कच्चे लोखंड, तांबे, मँगनीज, क्रोमाइट, चिनीमाती, चुनखडक ही महत्त्वाची खनिजे आहेत.

vi. यावर आधारित अनेक उद्योगधंद्यांचा विकास झालेला आहे. उदा. यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक उत्पादने, दूरसंचार साधने इत्यादी.

vii. माहिती तंत्रज्ञान उद्योगांची पुणे, हैद्राबाद व बेंगलुरू ही शहरे लोकप्रिय केंद्रे आहेत.

म्हणून, दखखनचे पठार औद्योगिकदृष्ट्या विकसित झालेला प्रदेश आहे.

***४. दखखनच्या पठारावर पर्यटन व्यवसायाचा चांगला विकास झालेला आहे.**

**उत्तर:** प्र.३ मधील (१४) चे उत्तर पाहावे.

## प्र.५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

### ७.१ प्राकृतिक रचना

***१. दख्खनच्या पठाराचे उपविभाग सविस्तरपणे स्पष्ट करा.**

**उत्तर:** दख्खनच्या पठाराचे पुढीलप्रमाणे उपविभाग पडतात:

i. सातपुडा-महादेव-मैकल पर्वतरांगा

ii. महाराष्ट्र पठार

iii. कर्नाटक-तेलंगणा पठार

iv. पूर्वेचे पठार

**i. सातपुडा-महादेव-मैकल पर्वतरांगा:**

अ. हा डोंगररांगांचा एक समूह असून, तो पूर्व-पश्चिम पसरला आहे आणि ही दख्खनच्या पठाराची उत्तर सीमा आहे.

ब. या समूहातील सर्वांत पश्चिमेकडील रांग म्हणजे सातपुडा पर्वतरांग होय. तिने नर्मदा व तापी नद्यांच्या दरम्यानचे क्षेत्र व्यापले आहे.


क. सातपुडा रांग पूर्व गुजरातपासून सुरू होते आणि पूर्वेकडे ती सुमारे ८०० किमीपर्यंत पसरली आहे.

ड. डोंगरांचा माथा म्हणजे एक प्रकारे पठारच असून त्यांची उंची सुमारे ७०० मीटर ते ९०० मीटरच्या दरम्यान आहे.

इ. सातपुडा पर्वताचा पूर्वेकडील विस्तार महादेव आणि मैकल रांगांच्या रूपाने दिसून येतो. या रांगा अनुक्रमे मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ राज्यांमध्ये आहेत.

फ. मैकल रांग साधारणपणे उत्तर-दक्षिण पसरली आहे आणि नर्मदा व महानदीचे खोरे यांमधील जलदुभाजक म्हणून ती काम करते.

ग. हे डोंगरसमूह नर्मदा, महानदी आणि वैनगंगा या तीन नदी प्रणालींची पाणलोट क्षेत्रे आहेत.


भारत
(दख्खनचे पठार)
उ.
विंध्य पर्वत
नर्मदा नदी
तापी नदी
सातपुडा पर्वत
महानदी
बंगालचा उपसागर
महाराष्ट्र पठार
महानदीचे खोरे
अ र बी स मु द्र
गोदावरी नदी
दख्खनचे पठार
तेलंगणा पठार
कृष्णा नदी
कर्नाटक पठार
कावेरी नदी
अंदमान व निकोबार बेटे
लक्षद्वीप बेटे
हिंदी महासागर

ii. **महाराष्ट्र पठार:**

अ. दख्खनच्या पठाराचा वायव्य भाग हा महाराष्ट्र पठार म्हणून ओळखला जातो.

ब. या पठाराच्या पश्चिम सीमेलगत पश्चिम घाट आहे.

क. बेसॉल्ट खडकांच्या क्षितिजसमांतर रचनेमुळे त्या संपूर्ण प्रदेशाला भिन्न उंचीवर असलेल्या सपाट भूभागांच्या मालिकेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

ड. महाराष्ट्र पठारावरील डोंगरमाथे सामान्यत: सपाट आहेत. पठाराची उंची सुमारे ५०० मीटर ते ६०० मीटर आहे.

इ. या पठाराचा उत्तर भाग तापी नदीच्या खोऱ्याने व्यापला आहे, त्याचा उतार पश्चिमेकडे आहे.

फ. तापी नदीच्या दक्षिणेकडील पठाराचा उतार पूर्व दिशेला आहे आणि त्याने गोदावरी व कृष्णा खोऱ्यांचा उगमाकडील भाग व्यापला आहे.

ग. पश्चिम घाटाच्या अनेक उपशाखा पश्चिम ते पूर्व दिशेकडे जातात आणि विविध नद्यांच्या खोऱ्यांचे दुभाजक बनतात.

घ. महाराष्ट्र पठाराचा पूर्व भाग वर्धा-वैनगंगा खोऱ्याने व्यापला आहे. या नद्या साधारणत: उत्तर-दक्षिण दिशेला वाहतात.

**iii. कर्नाटक-तेलंगणा पठार:**

अ. कर्नाटक-तेलंगणा पठार हे दख्खन पठाराचा सर्वांत दक्षिणेकडील भाग होय.

ब. हा स्फटिकमय खडकांचा प्रदेश आहे, मुख्यत: कणाश्म व पट्टिताश्म खडकांशिवाय काही रूपांतरित खडकही तेथे आढळतात.

क. या प्रदेशात उत्तरेला गोदावरी व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यांचा काही भाग असून दक्षिणेला कावेरी नदीचे खोरे आहे.

ड. संपूर्ण पठारावर अनेक कमी उंचीच्या आणि कणाश्म खडकांनी बनलेल्या गोलाकार टेकड्या आहेत.

**iv. पूर्वेचे पठार:**

**अ. महानदीचे खोरे:**

१. छोटा नागपूर पठाराच्या दक्षिणेला महानदीचे खोरे आहे.

२. तुलनेने हा कमी उंचीचा प्रदेश आहे आणि तो जवळजवळ सर्व बाजूंनी डोंगररांगांनी आणि पठारांनी वेढलेला आहे.

३. छत्तीसगढ राज्याचा मध्य भाग आणि ओडिशा राज्याचा पश्चिम भाग या खोऱ्याने व्यापला आहे.

४. पश्चिम सीमेवर मैकल रांगा आणि पूर्व सीमेवर पूर्व घाटाचे डोंगर आहेत.

५. सभोवताली असलेल्या पठारांची किंवा डोंगररांगांची सरासरी उंची ५०० मीटर, तर सखल प्रदेशांची उंची ३०० मीटर आहे.

६. या प्रदेशाचा उतार पूर्वेकडे आहे.

**ब. दंडकारण्य:**

१. छत्तीसगढ राज्याचा दक्षिण भाग आणि ओडिशा राज्याचा नैऋत्य भाग दंडकारण्य म्हणून ओळखला जातो.

२. दंडकारण्याचा मध्य भाग हे उंचावलेले पठार असून त्याची उंची सुमारे ७०० मीटर ते ८०० मीटर आहे.

३. या पठाराचे इंद्रावती नदीमुळे प्रत्यक्षात दोन भाग झाले आहेत.

४. दंडकारण्य क्षेत्र हे लोहखनिजाच्या साठ्यांसाठी प्रसिद्ध आहे.

**क. गर्हजात डोंगर:**

१. गर्हजात डोंगरांनी ओडिशा राज्याचा वायव्य भाग व्यापला आहे.

२. या प्रदेशातून ब्राह्मणी आणि बैतरणी नद्या वाहतात.

## ७.२ हवामान

***२. दखखनच्या पठारावरील हवामानाची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. दखखनच्या पठारावर मुख्यत: उष्णकटिबंधीय प्रकारचे हवामान आढळते.

ii. हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीचा दीर्घ कालावधी कोरडा असतो, त्या वेळी तापमान १८° सें. पेक्षा जास्त असते.

iii. उन्हाळा फार उष्ण असतो आणि अंतर्भागातील प्रदेशात तापमान ४५° सें. पेक्षाही जास्त असू शकते.

iv. पावसाळा जून ते सप्टेंबर दरम्यान असतो आणि सरासरी वार्षिक पर्जन्यमान सुमारे ७०० ते १५०० मिमी दरम्यान असते.

v. फक्त तामिळनाडूच्या पूर्व भागात ईशान्य मोसमी वाऱ्यांमुळे हिवाळ्यात पाऊस पडतो.

vi. या पठाराच्या मध्य भागात निम-शुष्क प्रकारचे हवामान आहे.

vii. यामध्ये कर्नाटक, तामिळनाडूचा पश्चिम आणि अंतर्गत भाग, पश्चिम आंध्र प्रदेश आणि मध्य महाराष्ट्र इत्यादी भागांचा समावेश होतो.

viii. हा दुष्काळप्रवण भाग असून येथे अनिश्चित स्वरूपाचा पाऊस पडतो. येथे वार्षिक पर्जन्यमान सरासरी ४०० ते ७५० मिमी आहे.

ix. मार्च ते मे हा उन्हाळ्याचा काळ असतो आणि सरासरी तापमान सुमारे ३२° सें. असते.

**३. दख्खनच्या पठारावरील नैसर्गिक वनस्पती आणि प्राणिजीवन यांची सविस्तर माहिती लिहा.**

**[जुलै १५, मार्च १६]**

**उत्तर:** i. वैविध्यपूर्ण प्राकृतिक रचना आणि इतर प्राकृतिक वैशिष्ट्ये यांमुळे दख्खनच्या पठारावर विविध प्रकारची जंगले आहेत.

ii. या प्रदेशात विषुववृत्तीय सदाहरित, उष्णकटिबंधीय आर्द्र पानझडी, उष्णकटिबंधीय शुष्क पानझडी आणि काटेरी वनस्पती आढळतात.

iii. विषुववृत्तीय सदाहरित वने अतिशय मर्यादित आहेत.

iv. दख्खनच्या पठारावर साग, साल, शिसव, चंदन, खैर, हिरडा आणि अर्जुन हे वृक्ष आढळतात.

v. दख्खनचे पठार हे अनेक सरपटणाऱ्या प्राण्यांचे माहेरघर आहे.

vi. पठारावरील जंगलात हरिण, चारशिंगी सांबर, काळवीट, गवा, रानरेडा इत्यादी गवत खाणारे प्राणी आढळतात.

vii. याशिवाय वाघ, रानटी कुत्रा, अस्वल हे मांसाहारी प्राणीही आढळतात.

viii. या प्रदेशातील 'शेकरू' व सुमारे ३०० पक्ष्यांच्या जातींचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

[प्र. ५ मधील (१) चा नकाशा पाहावा.]

## ७.५ लोकसंख्या आणि वसाहती

**४. कोणत्या प्रकारच्या वसाहती दख्खनच्या पठारावर दिसून येतात?**

**उत्तर:** i. महाराष्ट्रातील पठारी प्रदेश हा सुपीक मृदा, चांगला पाणीपुरवठा आणि विकसित शेती यांमुळे केंद्रित वसाहतीसाठी अनुकूल ठरला आहे.

ii. पठारावरील डोंगराळ भूभागांमुळे काही ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपातील वसाहती दिसून येतात.

iii. दक्षिण भारतामधील कर्नाटकातील उत्तर मैदान प्रदेश आणि आंध्र प्रदेशातील रायलसीमा प्रदेशाचे विखुरलेल्या वसाहती हे वैशिष्ट्य आहे.

## ७.५ लोकसंख्या आणि वसाहती

**४. कोणत्या प्रकारच्या वसाहती दख्खनच्या पठारावर दिसून येतात?**

**उत्तर:** i. महाराष्ट्रातील पठारी प्रदेश हा सुपीक मृदा, चांगला पाणीपुरवठा आणि विकसित शेती यांमुळे केंद्रित वसाहतीसाठी अनुकूल ठरला आहे.

ii. पठारावरील डोंगराळ भूभागांमुळे काही ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपातील वसाहती दिसून येतात.

iii. दक्षिण भारतामधील कर्नाटकातील उत्तर मैदान प्रदेश आणि आंध्र प्रदेशातील रायलसीमा प्रदेशाचे विखुरलेल्या वसाहती हे वैशिष्ट्य आहे.

iv. कावेरी आणि तुंगभद्रा नद्यांमधील प्रदेश हा असंख्य तलावांनी व्यापलेला आहे. या प्रदेशात केंद्रित वसाहती आढळतात.

v. मलनाड भागात विखुरलेल्या वाड्या व वस्त्या आढळतात.

vi. तामिळनाडूच्या उच्चभूमीवर याच प्रकारची वैशिष्ट्ये आढळून येतात.

[प्र. ५ मधील (१) चा नकाशा पाहावा.]

## ७.६ आर्थिक विकास

***५. दखखनच्या पठारावरील आर्थिक विकासाचे तपशीलवार स्पष्टीकरण करा.**

**उत्तर: i. शेती:**

दखखनच्या पठारावरील कापूस, ऊस आणि तांदूळ ही प्रमुख पिके आहेत.

दखखनच्या पठाराच्या पूर्व भागात प्रामुख्याने तांदूळ हे पीक घेतले जाते, तर उत्तर भागात गहू व कडधान्ये पिकवली जातात.

ज्वारी, कापूस, ऊस व तेलबिया यांचे पीक मुख्यत्वे महाराष्ट्राच्या पठारावर घेतले जाते.

दखखनच्या पठाराच्या पश्चिम भागात प्रामुख्याने बाजरीचे पीक घेतले जाते.

ii. **जलसिंचन:**

भंडारा जिल्ह्यातील तलाव म्हणजे त्या प्रदेशातील जलसिंचनाचा कणा आहे.

महाराष्ट्रातील बंधारा आणि कर्नाटकातील केरे या जलसिंचनाच्या पारंपरिक पद्धती आहेत.

शेती हा या प्रदेशातील मुख्य व्यवसाय असल्याने जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी जलसिंचन फार महत्त्वाची भूमिका बजावते.

iii. **खाणकाम:**

महाराष्ट्राच्या पठारावर उद्योगासाठी लागणारी खनिजे विपुल प्रमाणात सापडतात. यामध्ये मँगनीज, कोळसा, कच्चे लोखंड, चुनखडक, तांबे, बॉक्साइट, सिलिका वाळू, क्रोमाइट, चिनीमाती आणि खनिजमीठ यांचा समावेश होतो. यांपैकी बहुतांश खनिजे महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा पठारावर मोठ्या प्रमाणात सापडतात.

नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये बिटुमिनस प्रकारचा दगडी कोळसा सापडतो.

कर्नाटक हे देशातील मुख्य सोने उत्पादक राज्य आहे.

**iv. उद्योग:**

महाराष्ट्र हे देशातील एक अग्रेसर औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. सुती कापड उद्योग, साखर उद्योग, वाहन उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स उद्योग आणि अन्नप्रक्रिया उद्योग इत्यादी सर्व उद्योगांचा येथे विकास झाला आहे.

कर्नाटक आणि तेलंगणा पठारावर अनेक उद्योगधंदे आहेत जसे यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक उत्पादने, दूरसंचार साधने इत्यादी.

माहिती तंत्रज्ञान उद्योगांची पुणे, हैद्राबाद व बेंगलुरू ही शहरे नव्यानेच भरभराटीला आली आहेत.

**v. वाहतूक:**

दख्खनच्या पठारी प्रदेशात रस्ते व रेल्वे जाळे विकसित झाले आहे.

तेथे अनेक राष्ट्रीय महामार्ग आहेत. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे जी देशातील वेगवेगळ्या प्रदेशांना जोडलेली आहे.

vi. **पर्यटन:**

दख्खनच्या पठारावर नैसर्गिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वाची अनेक पर्यटनस्थळे आहेत.

औरंगाबाद, बिदर, विजापूर, म्हैसूर, पुणे ही ऐतिहासिक शहरे आहेत.

याशिवाय पठारी प्रदेशात जगभरातील लोकांना आकर्षित करणारी तुळजापूर, पंढरपूर, शिर्डी, गुलबर्गा, तिरूमला व मदुराई ही पवित्र स्थळे आहेत.

[प्र. ५ मधील (१) चा नकाशा पाहावा.]

## प्र.६. नकाशा वाचन

**तुमच्या भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रमांक ६० वरील आकृती क्रमांक ७.१ चे निरीक्षण करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. नकाशा काय दर्शवितो आहे?**

**उत्तर:** नकाशा दख्खनच्या पठाराची प्राकृतिक रचना दर्शवितो आहे.

**२. महाराष्ट्र पठारावरील मुख्य नद्यांची नावे लिहा.**

**[मार्च १४]**

**उत्तर:** गोदावरी व कृष्णा ही महाराष्ट्र पठारावरील मुख्य नद्यांची नावे आहेत.

**३. पश्चिम वाहिनी नदीचे नाव लिहा.**

**[मार्च १४, जुलै १६]**

**उत्तर:** पश्चिम वाहिनी नदीचे नाव तापी आहे.

**४. कृष्णा नदीच्या कोणत्याही एका उपनदीचे नाव लिहा.** **[मार्च १४]**

**उत्तर:** भीमा व तुंगभद्रा ही कृष्णा नदीच्या उपनद्यांची नावे आहेत.

**५. तापी नदीचा प्रवाह कोणत्या दिशेस आहे?**

**उत्तर:** तापी नदीचा प्रवाह पश्चिम दिशेस आहे.

**६. तापी नदीच्या उपनदीचे नाव लिहा.**

**उत्तर:** पूर्णा नदी ही तापी नदीची उपनदी आहे.

**७. गोदावरी नदी कोणत्या दिशेला वाहते?** **[जुलै १६]**

**उत्तर:** गोदावरी नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते.

**८. गोदावरी नदीच्या दोन उपनद्यांची नावे लिहा.**

**उत्तर:** इंद्रावती नदी व मांजरा नदी या गोदावरी नदीच्या उपनद्या आहेत.

**९. कर्नाटक पठारावरील दोन टेकड्यांची नावे लिहा.**

**[मार्च १४, जुलै १६]**

**उत्तर:** निलगिरी टेकड्या आण शेवरॉय टेकड्या ह्या दोन टेकड्या कर्नाटक पठारावरील टेकड्या आहेत.

**१०. दिलेल्या नकाशातील पठारांची नावे लिहा?**

**[जुलै १६]**

**उत्तर:** या नकाशात महाराष्ट्राचे पठार, कर्नाटक पठार आणि तेलंगणा पठार ही पठारे दर्शविली आहेत.